तात्काळ

क्रमांक : ८८०२/ ब कक्ष
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १९ जून, २०२०

प्रेषक :

सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

प्रति,

विधानसभेचे सर्व सन्मा. सदस्य.

**विषय :- मा.सदस्यांकडून तारांकित प्रश्नांच्या सूचना स्विकारण्याबाबत...**

**संदर्भ :- १) या सचिवालयाचे पत्र क्रमांक ७७८३/ब, दिनांक ८ मे, २०२०**

**२) विधानसभेच्या सन २०२० मधील तृतीय (पावसाळी) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांचा चक्रानुक्रम संदर्भातील निर्गमित करण्यात आलेला पत्रक भाग दोन क्र.५१, दिनांक ८ मे, २०२०**

**महोदय / महोदया,**

निदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या बुधवार, दिनांक १० जून, २०२० रोजी झालेल्या बैठकीत आगामी तृतीय (पावसाळी) अधिवेशन पुर्वनियोजित दिनांक २२ जून, २०२० ऐवजी सोमवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२० रोजीपासून विधान भवन, मुंबई येथे घेण्यात येणार असल्याचे निश्चित करण्यात आले आहे. तद्नुषंगाने सुधारित तारांकित प्रश्नांबाबतचा चक्रानुक्रम निर्गमित करण्यात येत आहे.

सुधारित कार्यक्रमानुसार महाराष्ट्र विधानसभेच्या **सोमवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२०** रोजीपासून सुरु होणाऱ्या आगामी तृतीय (पावसाळी) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक व त्या दिवसाकरिता गटामध्ये समाविष्ट असलेले मा.मंत्री तसेच प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक इत्यादी नमूद असलेला सुधारित चक्रानुक्रम पत्रक भाग दोनद्वारे सर्व मा.सदस्यांना **शुक्रवार, दिनांक १९ जून, २०२०** रोजी वितरीत करण्यात येत आहे. (प्रत सोबत जोडली आहे.)

**सोमवार, दिनांक २९ जून, २०२० रोजीपासून QIS या संगणक प्रणालीवर ONLINE पद्धतीने तारांकित प्रश्न सूचना स्विकारण्यात येतील. मा.सदस्यांना प्रश्न सूचना स्विकारण्याच्या प्रथम दिनांकापासून केव्हाही तथापि, चक्रानुक्रमात नमूद केलेल्या विवक्षित उत्तराच्या दिनांकाकरिता प्रश्न सूचना स्विकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्रश्न सूचना या सचिवालयाकडे ऑनलाईन पद्धतीने सादर करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.**

कृपया बदललेल्या कार्यक्रमाची नोंद घ्यावी अशी आपणांस विनंती आहे.

आपला,

(शिवदर्शन साठ्ये)
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

याची प्रत माहितीसाठी :-

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये, विधान भवन, मुंबई ४०० ०३२.

Scanned with CamScanner

# महाराष्ट्र विधानसभा
## पत्रक भाग दोन

**शुक्रवार, दिनांक १९ जून, २०२० / ज्येष्ठ २९ शके, १९४२**

**संदर्भ :- विधानसभेच्या सन २०२० मधील तृतीय (पावसाळी) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांचा चक्रानुक्रम संदर्भातील निर्गमित करण्यात आलेला पत्रक भाग दोन क्र.५१, दिनांक ८ मे, २०२०**

**महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२० मधील तृतीय (पावसाळी) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांचा सुधारित चक्रानुक्रम**

५८. महाराष्ट्र विधानसभेच्या **सन २०२०** मधील **तृतीय (पावसाळी)** अधिवेशनातील माननीय मंत्री महोदयांना तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी माननीय अध्यक्षांनी पुढीलप्रमाणे दिवस नेमून दिले आहेत. ज्या दिनांकास प्रश्नांचे उत्तर हवे असेल तो दिनांक विवरणाच्या स्तंभ (३) मध्ये दर्शविलेला असून त्या दिवशी विचारावयाच्या प्रश्नांच्या सूचना या सचिवालयास मिळण्याचा अखेरचा दिनांक विवतरणाच्या स्तंभ (४) मध्ये दर्शविलेला आहे. (प्रश्नांच्या सूचना मिळण्याचा अखेरच्या दिनांकास सुट्टी असेल त्यावेळी त्या पूर्वीचा दिनांक दर्शविण्यात आला आहे.)

आगामी तृतीय अधिवेशनासंबंधातील दिनदर्शिकेतील आखलेल्या कार्यक्रमात बदल झाल्यास त्यानुसार प्रस्तुत चक्रानुक्रमात बदल होईल. मा.सदस्यांना प्रश्नांच्या सूचना देण्यास मदत व्हावी म्हणून माननीय मंत्री आणि त्यांच्या अधिन असलेले विभाग यांचे विवरणपत्र सोबत जोडले आहे **(पृ.क्र.३ व ४)**

पहिल्या आठवड्यातील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट सोमवार, दिनांक २७ जुलै, २०२० रोजी दुपारी ४.०० वाजता व त्यापुढील आठवड्यांतील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे बॅलट त्यानंतरच्या प्रत्येक सोमवारी दुपारी ४.०० वाजता विधान भवन, मुंबई येथे उप सचिव / अवर सचिव यांच्या दालनात घेण्यात येईल. याबाबतची माहिती पत्रक भाग दोनद्वारे स्वतंत्ररित्या मा.सदस्यांना कळविण्यात येईल. सदरहू बॅलटसाठी मा.सदस्यांना उपस्थित राहता येईल, **परंतु त्यांना प्रवास किंवा दैनिक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.**

**:: वि व र ण प त्र ::**

| गट क्र. (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री (२) | प्रश्नांचा उत्तरांचा दिनांक (३) | प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| एक | (१) उप मुख्यमंत्री<br>(२) जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री<br>(३) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री<br>(४) ग्रामविकास मंत्री<br>(५) वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री<br>(६) महिला व बालविकास मंत्री<br>(७) मृद व जलसंधारण मंत्री | सोमवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२०<br>सोमवार, दिनांक १० ऑगस्ट, २०२०<br>*सोमवार, दिनांक १७ ऑगस्ट, २०२० | शुक्रवार, दिनांक ३ जुलै, २०२०<br>शुक्रवार, दिनांक १० जुलै, २०२०<br>*शुक्रवार, दिनांक १७ जुलै, २०२० |
| दोन | (१) मुख्यमंत्री<br>(२) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>(३) गृहनिर्माण मंत्री<br>(४) नगरविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री | मंगळवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०२०<br>मंगळवार, दिनांक ११ ऑगस्ट, २०२०<br>*मंगळवार, दिनांक १८ ऑगस्ट, २०२० | शुक्रवार, दिनांक ३ जुलै, २०२०<br>शुक्रवार, दिनांक १० जुलै, २०२०<br>*शुक्रवार, दिनांक १७ जुलै, २०२० |

..२/-

Scanned with CamScanner

| गट क्र. (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री (२) | प्रश्नांचा उत्तरांचा दिनांक (३) | प्रश्न सूचना मिळण्याचा अखेरचा दिनांक (४) |
|---|---|---|---|
| तीन | (१) गृह मंत्री<br>(२) महसूल मंत्री<br>(३) पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री<br>(४) कृषी, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री<br>(५) रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री<br>(६) वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री | बुधवार, दिनांक ५ ऑगस्ट, २०२०<br>बुधवार, दिनांक १२ ऑगस्ट, २०२०<br>*बुधवार, दिनांक १९ ऑगस्ट, २०२० | शुक्रवार, दिनांक ३ जुलै, २०२०<br>शुक्रवार, दिनांक १० जुलै, २०२०<br>*शुक्रवार, दिनांक १७ जुलै, २०२० |
| चार | (१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री<br>(२) अन्न व औषध प्रशासन मंत्री<br>(३) अल्पसंख्यांक विकास व औकाफ, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री<br>(४) शालेय शिक्षण मंत्री<br>(५) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री<br>(६) पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री<br>(७) परिवहन, संसदीय कार्य मंत्री<br>(८) पर्यटन, पर्यावरण, राजशिष्टाचार मंत्री | गुरुवार, दिनांक ६ ऑगस्ट, २०२०<br>गुरुवार, दिनांक १३ ऑगस्ट, २०२०<br>*गुरुवार, दिनांक २० ऑगस्ट, २०२० | सोमवार, दिनांक ६ जुलै, २०२०<br>सोमवार, दिनांक १३ जुलै, २०२०<br>*सोमवार, दिनांक २० जुलै, २०२० |
| पाच | (१) उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री<br>(२) कामगार, राज्य उत्पादन शुल्क मंत्री<br>(३) ऊर्जा मंत्री<br>(४) इतर मागास बहुजन कल्याण, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री<br>(५) वने, भूकंप पुनर्वसन मंत्री<br>(६) आदिवासी विकास मंत्री<br>(७) सहकार, पणन मंत्री<br>(८) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री | शुक्रवार, दिनांक ७ ऑगस्ट, २०२०<br>शुक्रवार, दिनांक १४ ऑगस्ट, २०२०<br>*शुक्रवार, दिनांक २१ ऑगस्ट, २०२० | मंगळवार, दिनांक ७ जुलै, २०२०<br>मंगळवार, दिनांक १४ जुलै, २०२०<br>*मंगळवार, दिनांक २१ जुलै, २०२० |

*** आगामी अधिवेशनाच्या सोमवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०२० ते शुक्रवार, दिनांक १४ ऑगस्ट, २०२० या कालावधीत वाढ झाल्यास पुर्वखबरदारी म्हणून जादा एक आठवड्याच्या प्रश्न सूचना कार्यवाहीत घेण्यात येत आहेत.**

**राजेन्द्र भागवत**
**सचिव (कार्यभार)**
**महाराष्ट्र विधानसभा**

**विधान भवन,**
**मुंबई.**
**दिनांक १९ जून, २०२०**

**प्रति :**

(१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्मा. सदस्य.

(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सर्व अधिकारी.

(३) महाराष्ट्र विधानमंडळातील सर्व कक्ष यांना अग्रेषित.

..३/-

Scanned with CamScanner

## मंत्र्यांची नावे व त्यांच्या अधीन असलेले विभाग

(१) **श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे -- मुख्यमंत्री**
   १) सामान्य प्रशासन विभाग
   २) विधी व न्याय विभाग
   ३) माहिती तंत्रज्ञान, माहिती व जनसंपर्क व इतर कोणत्याही मंत्र्यांना विवक्षितपणे नेमुन न दिलेले विभाग किंवा विषय

(२) **श्री.अजित अनंतराव पवार -- उप मुख्यमंत्री**
   १) वित्त विभाग
   २) नियोजन विभाग (रोजगार हमी योजना विषयक बाबी वगळून)

(३) **श्री.सुभाष राजाराम देसाई -- उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री**
   १) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (उद्योग व खनिकर्म विषयक बाबी)
   २) मराठी भाषा विभाग

(४) **श्री.अशोक शंकरराव चव्हाण -- सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**
   सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम वगळून)

(५) **श्री.छगन चंद्रकांत भुजबळ -- अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री**
   अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

(६) **श्री.दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील -- कामगार, राज्य उत्पादन शुल्क मंत्री**
   १) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (कामगार विषयक बाबी)
   २) गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क विषयक बाबी)

(७) **श्री.जयंत राजाराम पाटील -- जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री**
   जलसंपदा विभाग (खारभूमी विषयक बाबी वगळून)

(८) **श्री.अनिल वसंतराव देशमुख -- गृह मंत्री**
   गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क, परिवहन व बंदरे विषयक बाबी वगळून)

(९) **श्री.विजय उर्फ बाळासाहेब भाऊसाहेब थोरात -- महसूल मंत्री**
   महसूल व वन विभाग (महसूल विषयक बाबी)

(१०) **डॉ.राजेंद्र भास्करराव शिंगणे -- अन्न व औषध प्रशासन मंत्री**
   वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग (अन्न व औषध प्रशासन विषयक बाबी)

(११) **श्री.राजेश अंकुशराव टोपे -- सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**
   सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग

(१२) **श्री.नवाब मोहम्मद इस्लाम मलिक -- अल्पसंख्याक विकास व औकाफ, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री**
   १) अल्पसंख्याक विकास विभाग (अल्पसंख्याक विकास व वक्फ विषयक बाबी)
   २) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

(१३) **श्री.हसन मियालाल मुश्रीफ -- ग्रामविकास मंत्री**
   ग्रामविकास विभाग

(१४) **डॉ.नितीन काशिनाथ राऊत -- ऊर्जा मंत्री**
   ऊद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (ऊर्जा आणि नवीन व नवीकरणीय ऊर्जा विषयक बाबी)

(१५) **श्रीमती वर्षा एकनाथ गायकवाड -- शालेय शिक्षण मंत्री**
   शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (शालेय शिक्षण विषयक बाबी)

(१६) **डॉ.जितेंद्र सतिश आव्हाड -- गृहनिर्माण मंत्री**
   गृहनिर्माण विभाग

(१७) **श्री.एकनाथ संभाजी शिंदे -- नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**
   १) नगर विकास विभाग
   २) सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम)

..४/-

Scanned with CamScanner

(१८) **श्री.सुनिल छत्रपाल केदार -- पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री**
१) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विभाग (पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास विषयक बाबी)
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (क्रीडा व युवक कल्याण विषयक बाबी)

(१९) **श्री.विजय नामदेवराव वडेट्टीवार -- इतर मागास बहुजन कल्याण, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री**
१) इतर मागास बहुजन कल्याण विभाग
२) जलसंपदा विभाग (खार जमिनी विकास विषयक बाबी)
३) महसूल व वन विभाग (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विषयक बाबी)

(२०) **श्री.अमित विलासराव देशमुख -- वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री**
१) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (वैद्यकीय शिक्षण विषयक बाबी)
२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (सांस्कृतिक कार्य विषयक बाबी)

(२१) **श्री.उदय रविंद्र सामंत -- उच्च व तंत्र शिक्षण मंत्री**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग

(२२) **श्री.दादाजी दगडू भुसे -- कृषी, माजी सैनिक कल्याण मंत्री**
१) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग (कृषी विषयक बाबी)
२) सामान्य प्रशासन विभाग (माजी सैनिक कल्याण विषयक बाबी)

(२३) **श्री.संजय दुलीचंद्र राठोड -- वने, भुकंप पुनर्वसन मंत्री**
महसूल व वन विभाग (वने व भुकंप पुनर्वसन विषयक बाबी)

(२४) **श्री.गुलाबराव रघुनाथ पाटील -- पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री**
पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

(२५) **ॲड. के.सी पाडवी -- आदिवासी विकास मंत्री**
आदिवासी विकास विभाग

(२६) **श्री.संदिपानराव आसाराम भुमरे -- रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री**
१) नियोजन विभाग (रोजगार हमी योजना विषयक बाबी)
२) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग (फलोत्पादन विषयक बाबी)

(२७) **श्री.श्यामराव उर्फ बाळासाहेब पांडुरंग पाटील -- सहकार, पणन मंत्री**
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (सहकार व पणन विषयक बाबी)

(२८) **ॲड अनिल दत्तात्रय परब -- परिवहन, संसदीय कार्य मंत्री**
१) गृह विभाग (परिवहन विषयक बाबी)
२) संसदीय कार्य विभाग

(२९) **श्री.अस्लम रमजान अली शेख -- वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री**
१) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (वस्त्रोद्योग विषयक बाबी)
२) कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग (मत्स्यव्यवसाय विषयक बाबी)
३) गृह विभाग (बंदरे विषयक बाबी)

(३०) **ॲड यशोमती चंद्रकांत ठाकूर (सोनावणे) -- महिला व बालविकास मंत्री**
महिला व बालविकास विभाग

(३१) **श्री.शंकरराव यशवंतराव गडाख -- मृद व जलसंधारण मंत्री**
मृद व जलसंधारण विभाग

(३२) **श्री.धनंजय पंडितराव मुंडे -- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(३३) **श्री.आदित्य उद्धव ठाकरे -- पर्यटन, पर्यावरण, राजशिष्टाचार मंत्री**
१) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (पर्यटन विषयक बाबी)
२) पर्यावरण विभाग
३) सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार विषयक बाबी)

* * * * * * *

Scanned with CamScanner